# पुणे महानगरपालिका
# * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३४

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार दि. १३/११/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १४६२**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालय अधिनस्त सिंहगड रोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर या ३ क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१६/८/२०१९ ते ३०/८/२०१९ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप क्र.३/६७७ दि.७/११/२०१९ चे पत्र.

### सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. १४६३**

प्रभाग क्र. २८ ब मध्ये मुख्य रस्त्यावरील चौक व रस्ता येथे विविध ठिकाणी सी.सी.टि.व्ही. बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.डी.हरपळे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.२५,४२,०४९/- पेक्षा ०% कमी (अॅट पार रेट)) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,४२,०४९/- अधिक १८% जी.एस.टी. र.रुपये ४,५७,५६८=८२ असे एकूण र.रुपये २९,९९,६१७=८२ जीएसटीसह पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६८० दि.७/११/२०१९ चे पत्र.

### मागील सभेचे विषय

**विषय क्र. १४६४**

Empanelment of Agencies for Mobile Application Development of Pune Municipal Corporation कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण १५ निविदाधारकांनी सहभाग घेतला असून या निविदाधाराकांमार्फत दि. २१/०६/२०१९ रोजी तांत्रिक सादरीकरण करण्यात आले असून गुणात्मक छाननी केल्यावर मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या तक्त्यामधील निविदाधारकांची संगणक प्रणाली व मोबाईल अॅप्स विकसन करणेसाठी Empanelment Agencies नियुक्त करणेकरिता निवड करण्यात आलेली असून त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माहिती तंत्र/५८८ दि.१७/०९/२०१९ चे पत्र.

१) पुणे मनपाच्या विविध विभागांचे संगणक प्रणाली व मोबाईल अॅप्सचे विकसन करणेसाठी Empanelment Agencies नियुक्त करणेकरिता पात्र निविदाधारक संस्थाची ३ वर्षे करिता नियुक्ती करणेस.

२) सदर Empanelment Agencies संस्थामार्फत ई–निविदा प्रकियेव्दारे दरपत्रक मागवून किमान दराचे संस्थेमार्फत पुणे मनपाकडील विविध विभागाच्या आवश्यकते व गरजेनुसार संगणक प्रणाली व मोबाईल अॅप्सची कार्यवाही करून घेणेस.

३) सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.

RE11N103
सन २०१९–२०२०
१ मुख्य देखरेख वसुली वगैरे.
'ड ' सांख्यिकी व संगणक कार्यालय
३ विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तद्नुषंगिक कामे करणे

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४६५**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४६६**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील घरगुती व सोसायटी स्तरावर कचरा प्रक्रिया करणा-या उपाययोजनांचे (unit) विक्रेता यांचे स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या अनुषंगाने पॅनेल तयार करणे व पॅनेल मार्फत सबसिडी करीता धोरण ठरविणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/६०० दि.१८.०९.२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४६७**

श्री.अंबरीश गालिंदे, सह महापालिका आयुक्त तथा मुख्य लेखा परिक्षक यांची पुणे महानगरपालिकेच्या संगणकीकरण विषयक कामकाजाचे समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती केल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सामान्य प्रशासन/६१२ दि.२४/९/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. ७/११/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १४६८**

पर्वती टि.पी.स्किम क्र.३ येथील फा.प्लॉट क्र. २८ सदाशिव पेठ आंबिलओढा पुणे या पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या एकूण क्षेत्र २४,५४४.२३ चौ.मी. पैकी २७८९.७३ चौ.मी. इतके क्षेत्र विकसक श्री. नाईकनवरे यांचेकडे झोपडपट्टी पुर्नविकास योजनेकरिता हस्तांतरीत करणेसाठी पुणे महानगरपालिकेचे ना-हरकत पत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांना देणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/माव्य/६७८ दि.७/११/२०१९ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**